नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/०३/२०२६ (बुधवार )

---

# नागपूर ग्रामीण जिल्ह्यात विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या वार्षिक निरीक्षणांची सेरेमोनियल परेड यशस्वीरित्या संपन्न

मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परीक्षेत्र यांनी नागपूर ग्रामीण जिल्हयाचे वार्षीक निरीक्षक घेतले. सदर वार्षिक निरीक्षणा निमित्य आज दिनांक २५/०३/२०२६ रोजी पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा, नारी रोड ,टेकानाका, नागपुर येथे वार्षिक निरीक्षण सेरेमोनियल परेड शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

सदर परेड मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या कुशल नेतृत्वाखाली शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. सदर परेडसाठी विशेष पोलीस महानिरीक्षक यांची प्रमुख उपस्थिती असुन त्यांनी परेडची पाहणी (Inspection) केली आणि संचलनाची सलामी स्वीकारली. परेडमध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पीटी, स्कॉड ड्रिल, लाठी ड्रिल, शस्त्र कवायत, बॅंड पथकासह उल्लेखनीय सहभाग नोंदवुन उत्कृष्ट शारीरिक क्षमता, समन्वय व शिस्तीचे प्रदर्शन केले. तसेच दंगा काबू योजनेचा प्रात्यक्षिक सराव घेण्यात आला. यामध्ये पोलीस दलाने संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत जलद व प्रभावी प्रतिसाद देण्याची क्षमता दर्शविली.

यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी परेड व सादरिकारणात दाखविण्यात आलेल्या कौशल्यपुर्णता, शिस्तबद्धता आणि तत्परते बद्दल नागपुर ग्रामीण पोलीस दलाचे विशेष कौतुक केले. सदर परेड मध्ये श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर

जिल्हा, नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, सर्व शाखा प्रमुख उपस्थित होते.











**कत्तलीकरीता गोवंश जनावरांची वाहतुक करणाऱ्या तसेच अवैधरित्या जनावरांना बांधुन ठेवणाऱ्या आरोपीताविरूध्द गुन्हा नोंद, ७० गोवंश जनावरांची सुटका**
**४ चारचाकी वाहन, २ दुचाकी वाहनासह ३० लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त**
**स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २५/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, धरती मुर्ती रोडवरील योगेश देशभ्रतार यांचे शेतामध्ये काही इसम यांनी अवैधरित्या कत्तल करण्याच्या उद्देशाने गोवंश जनावरांना एकत्रित बांधून ठेवलेले आहे. तसेच त्या ठिकाणावरून जनावरांना चार चाकी वाहनांमध्ये भरून नेणार आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे तात्काळ धरती मुर्ती रोडवरील योगेश देशभ्रतार यांचे शेताजवळ सापळा रचला. शेताच्या काही अंतरावर पोलीसांनी नाकाबंदी केली असता त्यांना मारूती सुझुकी अर्टीगा कार क्र. एम एच १४ डी एन ७०६४ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहन चालकाने पोलीसांना पाहुन वाहन सोडुन पळ काढला. सदर वाहन गोवंश जनावरांना वाहुन नेणाऱ्या वाहनांचे पायलटींग करून त्यांना

महीती देत असल्याचे समजले. त्यानंतर काही वेळाने पिकअप क्र. एम एच ३० बी डी २३४८ आणि महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच २७ एक्स ८२१२ हे दोन वाहन शेतातुन बाहेर आले. नमुद वाहन चालकांनी पोलीसांनी पाहुन त्यांच्या ताब्यातील वाहने न थांबविता निघुन गेले. पोलीसांनी सदर वाहनाचा पाठलाग केला असता आरोपींनी वाहने सोडुन जंगलात पळ काढला. **पोलीसांनी जंगलात पाठलाग करून शिताफिने एका आरोपीला पकडुन नाव पत्ता विचारले असता आरोपी नामे रिजवान खान हारुण खान, वय २४ वर्षे, रा. लालखडी अमरावती अशी माहीती त्यांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष वाहने तपासली असता महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच ३० बी डी २३४८ मध्ये ११ गोवंश तसेच महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच २७ एक्स ८२१२ मध्ये १३ गोवंश जनावरे मिळुन आली. दोन्ही वाहनातील गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

आरोपी नामे रिजवान खान हारुण खान याच्या कडे कौशल्यपुर्ण तपास करून जनावरे कोठुन आणली असे विचारले असता त्यांनी धरती मुर्ती रोडवरील योगेश देशभ्रतार यांचे शेतामध्ये नेले पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता तेथे ४६ गोवंश जनावरे बांधलेली होती. तसेच जनावरे वाहतुकी साठी लागणारे महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच ४० बी जी ३३०९ किंमती त्यासोबतच दुचाकी वाहन हिरो होंडा स्प्लेंडर एम एच ३१ ए के ८२८१ आणि हिरो होंडा पॅशन एम एच ४० एच २९६५ ही वाहने मिळुन आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ४ चारचाकी वाहने किंमती २५,००,०००/—, २ दुचाकी वाहने एकुण किंमती ६०,०००/— रूपये, ७० गोवंश जनावरे किंमती ५,००,०००/— रूपये आणि आरोपी रिजवान खान हारुण खान याच्या ताब्यातील एक अॅड्रॉईड फोन किंमती १०,००० /— रूपये असा एकुण ३०,७०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. सदर कारवाईमध्ये एकुण ७० गोवंश जनावरांची सुटका करून त्यांना पुढील देखभाली करीता जैन गोसेवा समिती राऊळगाव, ता.कळमेश्वर येथे दाखल करण्यात आले आहे. नमुद प्रकरणी वर नमुद आरोपी आरोपी नामे रिजवान खान हारुण खान, वय २४ वर्षे, राहणार लालखडी अमरावती , शेत मालक आरोपी योगेश देशभ्रतार, रा. मूर्ती, ता.काटोल यांच्यासह एकुण ९ आरोपींवर गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. नागपुर ग्रामीण पोलीस सदर गुन्हयात साखळी पुरावे जोडत पुढील तपास करीत आहेत.**




## अवैधरीत्या डीझेलची विक्रीसाठी साठवणूक करणाऱ्या ३ आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, १९०० लीटर डीझेल सह १ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त
## बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक २४/०३/२०२६ रोजी बोरी पोलीसांना गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत मौजा रुईखैरी येथील **आरोपी १) रणजीत बलदेव सिंग ठाकूर, वय ४९ वर्ष (२) रोशन कन्नूलाल यादव, वय ४० वर्ष, दोन्ही रा. पुलगाव, ता. देवळी, जिल्हा वर्धा (३) मोहम्मद अकलीम मोहम्मद अस्लम शेख, रा. रुईखैरी** यांनी आपले घरी स्वत:चे फायदया करीता अनाधिकृत विनापरवाना अत्यावश्यक वस्तु डीझेल चा साठा करून ठेवला आहे. अशी माहीती प्राप्त होताच बुटीबोरी पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी,उपविभागिय पोलीस अधिकारी,नागपुर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात कारवाई करत पोलीस पथकाने मौजा रूईखैरी येथे पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) रणजीत बलदेव सिंग ठाकूर, वय ४९ वर्ष (२) रोशन कन्नूलाल यादव, वय ४० वर्ष, दोन्ही रा. पुलगाव, ता. देवळी, जिल्हा वर्धा (३) मोहम्मद अकलीम मोहम्मद अस्लम शेख,**

**रा. रुईखैरी यांच्या घरी** अवैधरीत्या विनापरवाना प्लास्टिक कॅन मध्ये अत्यावश्यक वस्तु डिझेलचा साठा केलेला मिळून आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून २० लिटर क्षमतेच्या ९५ प्लास्टिक कॅन मध्ये एकूण १९०० लिटर डिझेल किंमती १,९०,०००/— रुपये व साहित्य असा एकूण १,९४,५५०/— रूपयाचा मुद्‌देमाल जप्त केला आहे. आरोपी क्रमांक १ व २ यांना अटक करण्यात आहे.**

**नमुद प्रकरणी तिन्ही आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम ७, ३ अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये सहकलम ८(१) पेट्रोलियम ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक २३/०३/२०२६ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बाजार चौक केळवद येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे केळवद पोलीसांनी घटनास्थळी धाड टाकली असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा

जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) प्रशांत उर्फे दादा खुशालजी ढोबळे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र २, झोपडपटटी केळवद २) जय शंकर ससनकर, वय १९ वर्ष, रा. तेलीपुरा वार्ड क्र १, केळवद ३) भावेश श्यामराव महाकाळकर, रा. पहलेपार केळवद ४) अरुन बाळाजी दोरखंडे, रा. झोपडपटटी केळवद , ५) विनोद बावनकर, रा. बेलदार मोहल्ला, केळवद ६) भावेश जगदीश ढोबळे, रा. तेलीपुरा केळवद** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून **५२ तास पत्ते आणि** रोख रक्कम २५००/—रूपये ०२ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल किंमती २५,०००/—रूपये असा एकुण २७,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०६ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक २४/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १५४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे नितीन विठ्ठल जगने, वय ३६ वर्ष, रा. झिंझेरीया, ता. रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) रविन्द्र मोहन ठाकुर, वय २५ वर्ष, रा. कोदेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर २) लिलाधर शंकर धार्मिक, वय ३६ वर्ष, रा. नविन वस्ती खापा, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, अशा एकुण ०४ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०४ गुन्हे दाखल केले आहे.

नमुद कारवाईत एकुण ०७ लिटर मोहाफुल गावठी दारू, १८९० मिली देशी दारू असा एकुण १५४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने